महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक:पोमसं/२०/१९५/ Community Policing Scheme /१७७/२०१९ मुंबई, दिनांक: २५/०२/२०२४

**वाचा :-** या कार्यालयाचे क्र पोमसं /२४/ जेष्ठ नागरिक/२०६/२०१० रोजीचे दि.२८/०१/२०१३ चे परिपत्रक पहावे.

******

प्रस्तावना :-

जेष्ठ नागरिक हा समाजाचा एक महत्वपुर्ण व मोठा घटक असल्याने त्यांचे सुरक्षिततेतेसाठी व त्यांच्या समस्याचे योग्य समाधान करणाच्या दृष्टीने जेष्ठ नागरिकांकरिता विशेष योजना करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता जेष्ठ नागरिकांबरोबर पोलीसांचा सुसंवाद राहावा म्हणुन या कार्यालयाचे उपरोक्त दि.२८/०१/२०१३ परिपत्रकान्वये "जेष्ठ नागरिक सुरक्षा समिती" स्थापन करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

शासनाने दि.१०/०७/२०२३ चे पत्रान्वये मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७/०५/२०२३ रोजी ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्याबाबत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिकांवरील सध्याच्या होत असलेले कौटुंबिक, सामाजिक अत्याचार लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष स्थापन करावे, या मुद्यांच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांनी खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत.:-

" संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांच्या संघटनेतील एक ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखाली व संबंधित पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांची एक समिती गठीत करण्यात यावी. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष स्थापन करण्यात यावा."

तरी, सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**( सुहास वारके )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व.सु)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधिक्षक,

प्रत,

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र,